ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



# लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-४)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. युवराज धबडगे — मराठी विभागप्रमुख
प्रा. नागेश बोन्तेवाड — मराठी विभाग
दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●
डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक / लेखक-संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील शैक्षणिक जाणिवा<br>- प्रा. नागेश बोंतेवाड | 1 - 4 |
| 2. | वामनदादा कर्डक : आंबेडकरी गीतकार<br>- प्रा. विजयश्री विठ्ठल गवळी | 5 - 8 |
| 3. | डॉ. बाबासाहेबांचे बुद्धत्व विशद करणारी वामनदादांची कविता<br>- प्रा. डॉ. विश्वजित कांबळे | 9 - 15 |
| 4. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील शैक्षणिक तत्त्वज्ञान<br>- डॉ. मारोती गायकवाड | 16 - 23 |
| 5. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री-जाणिवा<br>- प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे | 24 - 26 |
| 6. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकर दर्शन<br>- डॉ. संतोष देशमुख | 27 - 31 |
| 7. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान (शैक्षणिक)<br>- प्रा. कातकडे केशव श्रीरंग / प्रा.डॉ. रमाकांत का. गजलवार | 32 - 36 |
| 8. | आंबेडकरी ऊर्जा पुरवणारे समर्थ लोककवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 37 - 41 |
| 9. | लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- मंगल कचरु सांगळे | 42 - 47 |
| 10. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातून प्रकट झालेले आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. लालबा दुमटकर | 48 - 50 |
| 11. | वामनदादा कर्डकांचे काव्य : आंबेडकरी विचार चळवळीची शिदोरी<br>- प्रा. कैलाश माणिकराव मुटकुळे | 51 - 54 |
| 12. | 'माझ्या जीवनाचं गाणं' : एका लोककलावंताचा जीवन संघर्ष<br>- प्रा. डॉ. आनंद वारके | 55 - 59 |
| 13. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. महालक्ष्मी मोराळे | 60 - 65 |


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal. Shirur, Dist. Pune.

| | | |
|---|---|---|
| 14. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बुद्ध तत्वज्ञान<br>- श्री. विजयकुमार बुद्धप्पा झुंबरे | 66 - 69 |
| 15. | लोककवी वामनदादा कर्डक यांचा कवितेतील भीमदर्शन<br>- प्रा. डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 70 - 74 |
| 16. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील क्रांतिकारकता<br>- डॉ. सागर गवई | 75 - 77 |
| 17. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. वर्षा दिगंबर गायकवाड | 78 - 82 |
| 18. | महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे गीतकार<br>- प्रा. डॉ. प्रविण वसंतराव चव्हाण | 83 - 85 |
| 19. | लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते<br>- डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे | 86 - 89 |
| 20. | आंबेडकरी चळवळीतील समाजप्रबोधक : वामनदादा कर्डक<br>- श्री. धनंजय वसंत भाट | 90 - 93 |
| 21. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. देवयानी चव्हाण | 94 - 97 |
| 22. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील सामाजिकता<br>- विद्या कुलकर्णी | 98 - 103 |
| 23. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. राजा जगताप | 104 - 107 |
| 24. | लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- प्रा. डॉ. सुनील गणपत घनकुटे | 108 - 111 |
| 25. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिक विचार<br>- प्रा. केशव विठ्ठल कोकाटे | 112 - 113 |
| 26. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- शीला विठ्ठलराव डोंगरे | 114 - 117 |
| 27. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री<br>- डॉ. कैलास सोनू महाले | 118 - 121 |
| 28. | मानवतेची हाक देणारा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. व्यंकटी पावडे | 122 - 125 |




SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal. Shirur, Dist. Pune.



# लोककवी वामनदादा कर्डक यांचा कवितेतील भीमदर्शन

- प्रा. डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ.
ता. शिरूर जि. पुणे
भ्रमणध्वनी-९७६४२८४०३२.
hlbhawari@gmail.com

---

वामनदादा कर्डक हे मराठीतील लोकशाहीर, लोककवी, लोकशिक्षक, प्रसिद्ध गीतकार आणि आंबेडकरी चळवळीतील खंदे कार्यकर्ते होते. वामनदादा कर्डकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर व आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने ४,००० पेक्षा अधिक गीते रचली आहेत. लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तेजस्वी विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि चिंतनशील लिखाणातून महाराष्ट्रभर पोहचविण्याचे काम केले. बुद्ध, फुले, आंबेडकर यांचा विचार हा वामनदादांच्या जगण्याचा ध्यास होता. हे विचार प्रभावीपणे प्रसारणाचे काम वामनदादा जीवनाच्या शेवटापर्यंत करत राहिले.

**वामनदादांचा जीवन प्रवास -**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या गावी १५ ऑगष्ट १९२२ रोजी वडील तबाजी व आई सईबाई यांच्या पोटी वामनदादांचा जन्म झाला. घरची परिस्थिती अगदीच बेताची होती. त्यामुळे दारिद्र्याचे चटके त्यांना अगदी कोवळ्या वयापासूनच सोसावे लागले. गुरे सांभाळणे, गारेगार विकणे, कोळसा विकणे, गिरणीत कामाला जाणे, मातीकाम, सिमेंट कौन्क्रीटचे काम, अशा अनेक कामांमध्ये त्यांचे बालपण नासले. जत्रेत रेवड्यांसाठी कुस्त्यांच्या फडात उतरणे कुस्त्या जिंकणे अशा काही छंदाबरोबरच गावातील तमासगीरांची गाणी ऐकण्याचा छंद त्यांना जडला त्यांच्या कानाला आणि मनाला या लहानपनातच गायनाचे आणि शब्दाशी खेळण्याचे वेड लागले. ते संभळ वाजवू लागले. शाहिर घेगडे यांचा नाशिक सत्याग्रहाचा पोवाडा त्याच्या गायनाला आणि लेखनाला खूप मोठी प्रेरणा देऊन गेला. आणि १९४३ सालापासून वामनदादांच्या लेखनाला प्रारंभ झाला

सुरुवातीला वामनदादांना वाचता येत नव्हते शिक्षणाने लहानपणीच त्यांच्या बरोबर लपंडाव खेळला होतो शिक्षण नाही याचे शल्य नेहमी बोचत होतेच पण त्यामध्ये एक ठिणगी पडली. एका अशिक्षित माणसाने गावाकडून आलेले पत्र वाचून दाखविण्याची वामनदादांना विनंती केली. वामनदादांना अक्षर ओळख नसल्यामुळे ते खजील झाले पण हार मानतील ते वामनदादा कसले. त्यांनी आठच दिवसात आख्खी बाराखडी तोंडपाठ केली आणि वाचनाची मुहुर्थमेढ रोवली. वाचनामुळे त्याच्या आयुष्यालाच गती मिळाली. मग त्यांचा लेखन प्रवासही जोमाने सुरु झाला.

'वाटचाल' हा वामनदादांचा पहिला कवितासंग्रह १९७२ मध्ये वामन निंबाळकर यांनी प्रथम प्रकाशित केला.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune

'मोहळ' हा त्यांचा दुसरा गीतसंग्रह तसेच कॉ. भास्करराव जाधव यांनी 'हे गीत वामनाचे' हा तिसरा गीतसंग्रह १९९७ साली प्रकाशित केला. तसेच 'तुफानातले दिवे' व समग्र वामनदादा कर्डक (खंड-पहिला) या संग्रहामधून वामनदादांची गीते प्रकाशित झाली आहेत. 'माझ्या जीवनाचं गाणं' हे १९९६ मध्ये प्रकाशित झालेले त्यांचे आत्मकथन हे त्यांचा संपूर्ण जीवनाचा आलेख मांडते. "सांगा या वेडीला माझ्या गुलछडीला' (चित्रपट - सांगत्ये ऐका)"ह्यो ह्यो पाहुणा, शकुचा मेहुणा, तुझ्याकडे बघून हसतोय गं, काही तरी घोटाळा दिसतोय गं" (संगीत- मधुकर पाठक; स्वर- श्रावण यशवंते) ही लोकप्रिय चित्रपट गीते वामनदादांच्या उत्कृष्ट गीतलेखनाची पावती देतात. पुढे जाऊन त्यांनी नाटक लिहिले चित्रपट कथाही लिहिल्या

वामनदादांच्या लेखणीवरती लोकांनी भरभरून प्रेम केले अनेक चाहत्यांनी त्यांना 'प्रबुद्ध कवीरत्न', 'महाकवी वामनदादा' अशा उपाधी दिल्या. तसेच 'मानबमित्र', 'संत नामदेव पुरस्कार', 'शाहिर अमर शेख पुरस्कार', 'भिमस्मृती पुरस्कार', 'युगांतर पुरस्कार' तसेच त्यांना 'रजतपत्र, ताम्रपत्र' ही त्यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या साहित्य संस्कृती मंडळाने गौरववृत्ती देऊन त्यांचा सन्मान केला सामान्य माणसाच्या काळजावर राज करणारा हा कलंदर कवी १५ मे २००४ रोजी इहलोकीची यात्रा संपवून पुढील प्रवासास निघून गेला. त्याच्या मृत्यू संदर्भात यशवंत मनोहर म्हणतात, " असा हा वामनदादा १५ मे २००४ रोजी नाशिक येथे दुपारी सव्वा दोन वाजता काळाच्या पडद्याआड गेले. " चल झोप शांत आता माझे मरण म्हणाले... (मरण) असे त्यांनी लिहिले होते. ही आग शरणात शांत झाली की कोणी सांगावे? पण हा महागीतकार काळाच्या पडद्यापुढे मात्र आपल्या हजारो गीतांचा समुद्र ठेवून गेला काळाचा पडदा त्यांच्यासाठी छान पारदर्शक झाला. गीतातून आता वामनदादा जगणार आहते."[१].

**वामनदादांचे गीतलेखन-**

वामनदादांना लहानपणीच तमाशातील गाण्याचे वेड लागले होते. चित्रपटातील संगीतही त्यांना साद घालत होते त्यातच शाहिरांचे पोवाडे ऐकून त्यांच्या अंगावर शहारे येत होते. संभळ वाजविण्यात ते तरबेज झाले होते. अशातच महामानव क्रांतिसूर्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांची सावली त्यांच्यावर पडली आणि त्याचे आयुष्याच्या प्रवासाला एक दिशा मिळाली प्रेरणा मिळाली. वामनदादांची आणि बाबासाहेबाची खूप वेळा प्रत्येक्ष भेट झाली होती. बाबासाहेबांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर होता. आणि त्यामुळेच वामनदादांनी आपल्या भीमाचे कार्यकर्तृत्व गीतामधून रेखाटण्यासाठी सारे आयुष्य झोकून दिले. दादांनी सुरुवातीला अनेक विषयावर गीत लेखन केले. त्यानंतरचे लेखन मात्र संपूर्ण आबेडकर चळवळीला वाहिलेले दिसते. त्यांनी बाबासाहेबाच्या विचाराशी असणारी एकनिष्ठता शेवट पर्यंत कधीही सोडली नाही. या संदर्भात काव्यकस्तुरी या संपादित पुस्तकाच्या प्रस्तावनेत संपादकम्हणतात, " वामनदादा कर्डक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे निष्ठावान व प्रामाणिक अनुयायी होते. बंडखोर कवी, लोकशाहीर, गीतकार, आंबेडकरी गीतांचे चालतबोलत झाड, आंबेडकरी चळवळीचा महान भाष्यकार, फकिरी वृत्तीचा कलंदर माणूस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा दाही दिशांमध्ये घेऊन जाणारा एक पहाडी आवाज, अशी त्यांची ठसठशीत प्रतिमा आहे. अल्पशिक्षित वामनदादांना बाबासाहेबांच्या विचाराची उर्जा लाभली होती. त्यांनी चार हजारावरून गाणी लिहिली. वामनदादांनी आंबेडकरी चळवळीचे गाणे जनतेचे प्रबोधन करण्यासाठी लिहिले आणि गायले. आपल्याला अवगत असलेली कला त्यांनी आंबेकरी विचारांच्या चरणी अर्पण केली. आपल्या गीतांमध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या समतावादी विचारांशी कोठेही फारकत होऊ दिली नाही"[२] वामनदादांनी शेवटच्या श्वासापर्यंत बाबासाहेबांच्या विचाराशी कोठेही फारकत घेतल्याची दिसत नाही बाबासाहेबांचे विचारच त्यांच्या लेखनाची मुख्य प्रेरणा होती

"वामनदादा हे प्रतिभावंत गीतकार आहेत. ते आंबडेकरवादी गीतकार म्हणून प्रख्यात आहेत. या आंबडेकरी जाणिवांच्या गीतांमागील निर्मितीकारण आंबेडकरांनी केलेले क्रांतीकार्य आणि या क्रांतीकार्यामागेउभे असलेले तत्वज्ञान हेच आहे. कोणत्याही प्रतिभावंताच्या लेखनामागे एक प्रेरणा उभी असते. तशी वामनदादांच्या गीतामागेही ती उभी आहे."[३]

**भिमजन्माचे व कार्याचे वर्णन करणारी कविता-**

बाबासाहेबांच्या सान्निध्यात आलेल्या माणसांवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव पडला नाही असे होणे शक्य नाही. त्यांच्या सावलीतील अनेक माणसे क्रांतिकारक झाले, कवी झाले, लेखक झाले. गीतकार म्हणून नावारुपास आले.



SHRI PADM... JAIN COLLEGE

त्याला वामनदादाही काही अपवाद नव्हते. वामनदादांनी तर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार हेच त्यांच्या जीवनाचे जगण्याचे सूत्र ठरविले होते. बाबासाहेबांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आणि त्यांच्या मृत्यूनंतरही बाबासाहेबाच्या विचारांची पेरणी समाज मस्तकात ते करतच होते. भिमजन्माचे वर्णन करणाऱ्या अनेक कविता त्यांनी लिहिल्या.

"हो, भीम जन्माची ऐका कथा
सन अठराशे ऐक्क्यान्नवला शुभ ठरणारा
दिन गुरुवार आला गुरुमंत्र देणारा
एप्रिल चौदा उगवताच उगवला तारा
लागला या भूमीला नव्या युगाचा वारा
सात कोटींचा जन्मला पिता
हो, भीम जन्माची ऐका कथा" ( भीम जन्माची कथा)

बाबासाहेबांच्या जन्माचे वर्णन करतांना बाबासाहेबांच्या जन्माची तारीख, वार सांगून ते थांबत नाहीत तर बाबासाहेबांचे वडील लष्करात सुभेदार होते. त्यांच्याही शौर्याचे वर्णन ते करतात. एकूणच भीम जन्माची कथा या कवितेतून महार जातीच्या बहादुरीचा इतिहासच ते मांडतात.

"उद्धरली कोटी कुळे
भीमा तुझ्या जन्मामुळे
एक ज्ञानज्योतीने कोटी, कोटी ज्योती
उजळे, काळोख मावळे
भीमा तुझ्या जन्मामुळे' (भीमा तुझ्या जन्मामुळे)

एका भीमाचा जन्म झाला आणि इथल्या विषमतेवर आधारित असणाऱ्या व्यवस्थेला मात्र सुरुंग लागला. शिक्षणाचे वारे वाहू लागले, अंधारयुग जाऊन प्रकाशपर्व सुरु झाले समाज जागृत झाला. आपल्या हक्क, कर्तव्याची जाणीव होऊ लागली. कर्मकांडाचे अवडंबर माजविणार्या धर्माच्या ठेकेदाराचे मनसुबे उघडे पडू लागले. कोट्यावधी अस्पृश्याच्या जगण्याला अर्थ आला. त्यांना माणूस म्हणून नवा जन्म मिळाला

"घडले हे छप्पन्न साली, क्रांतिची लाट आली
आली ती लाट आली, मुक्तीची वाट झाली
माय-लेकरांची तेथे पुन्हा भेट झाली
क्रांतीचे गीत गाया, ममता पेरीत जाया
लाभले कवीला नवे सूर, रंगाल भूमीचा नूर' (नवा नूर)

बाबासाहेबांच्या विचाराच्या प्रभावाने कशापद्धतीने समाज परिवर्तन झाले या संदर्भातील क्रिचन वरील कवितेतून दादांनी मांडले आहे. "आपला जन्मच भीमगाणी गाण्यासाठीच झाला आहे, अशा एका उच्च कोटीच्या त्यागी वृत्तीतून वामनदादा वागत होते. सर्व प्रकारचा स्वार्थ बाजूला ठेवून ते या कार्यात गुंतले होते. भीमाचे बालपण, तरुणपण, वैवाहिक जीवन, चळवळी संसेदेतील कार्य, राज्यघटनेची निर्मिती, ज्ञानसंपदा, राजगृह असे सर्वच वामनदादांच्या गीतांत अवतरत होते"[४]

"तुफानातले दिवे, आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा, पाऊस धारा मुळी न आम्हां शिवे
तथागतांच्या चिरंतनातून मानवतेच्या कणाकणातून
तेल मिळाले नवे, आम्ही तुफानातले दिवे ||
किंवा
जळू परंतु धरती उजळू प्रकाश येथे असाच उधळू
सदा चांदणे, सुखी नांदणे, हेच आम्हाला हवे



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

आम्ही तुफानातले दिवे || (आम्ही तुफानातले दिवे)

बाबासाहेबांच्या विचारांच्या वारसदारांमध्ये प्रचंड उर्जा निर्माण झाली आहे तुफानातही, वादळातही, पाऊस-वार्यातही खंबीरपणे उभे राहण्याची हिंमत यांच्या मध्ये आली आहे, समाजपरिवर्तणासाठी, जगाच्या उद्धारासाठी स्वत: जळून समाज प्रकाशमान करण्याचे स्वप्न वामनदादांची कविता पाहते. या तुफाणातील दिव्यांना गौतम बुद्ध आणि बाबासाहेबांच्या विचारांचे तेल आणि लढण्याच्या परंपरेची वात मिळाल्यामुळे त्याच्यामध्ये प्रचंड विश्वास निर्माण झाल्याचा दिसतो.

**आंबेडकरी चळवळीला लागलेल्या ओहटीचे वर्णन करणारी कविता-**

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वानानंतर चळवळीला ओहटी लागली असतांना वामनदादाची गीते मात्र अधिक प्रखरतेने समाजप्रबोधन करू लागली. परंतु स्वार्थापोटी चळवळीतून अनेक लोक बाहेर पडू लागले तेंव्हा वामनदादा म्हणतात,

"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेचे टोक असते
वाणीत भीम आहे करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते"(भीमा तुझ्या मताचे)

बाबासाहेब यांच्या नंतरही सर्वांनी एकाच विचाराने राहावे आणि बाबासाहेबांच्या विचारानेच पुढे चालावे असे वामनदादांना वाटत होते. एकीने राहिले तरच बाबासाहेबानी निर्माण केलेला समाज आपल्याला टिकविता येईल पण तरीही मात्र स्वार्थी प्रवृतीच्या पुढार्यांमुळे ही दरी अधिकच वाढत चालली होती. या फाटाफुटीमुळे वामनदादा कमालीचे अस्वस्थ झाले.

"म्हणविती भीमाचे चेले जरी हे मेले
यांनीच भीमाचे तुकडेतुकडे केले."(हे गीत)

किंवा

"नीच नीतीचा कापू गळा, त्या रक्ताचा लेवू टिळा
मंजुळा, पाजळ आपुला विळा न चल ग रणामधी
ढोल ढपुले पुरुष आपुले बांगडीत गुंतलेगं
उरले सुरले हत्तीवाले सांगडीत गुंतले गं
जोम तयांचा झाला शिळा
कुठं दिसेना झेंडा निळा, मंजुळा..."(हे गीत वामनाचे)

बाबासाहेबांनी निर्माण केलेला बुरुज असा एकाएकी ढासळू लागल्यामुळे आपल्या भिमाईचे विचार आता पुढे कसे जातील यांची चिंता वामन दादांचे काळीज चिरते. म्हणून ते चिडतात त्याच्या कवितेतून अंगार बाहेर पडू लागतो. पुरूषाचा नाकर्तेपणामुळे तसेच त्यांच्या भोगवादी वृत्तीमुळेतो ढेपाळलेला दिसतो आहे. त्यामुळे स्त्री शक्तीने आपली लढाई लढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे असे आवाहन ते मंजुळाला करतांना दिसतात

"अन्यायाची चिरा चांबडी, चिरा करा चिंधडया
चिरा करा चिंधडया, नाही तर भरा हाती बांगड्या
बहाद्दराची फौज फाकडी गावकुसाला भिडून
तुटून पडती तुमच्या-माझ्या माता बहिणीवरी
चला चला त्या नराधमांच्या तोडू चला तंगड्या' (भरा हाती बांगड्या)

वामनदादाच्या या कवितेतून त्यांच्या काळजाला झालेल्या धगधगत्या वेदणांचे वास्तव दिसते माणसाला पेटून उठण्यास व बंड करायला लावणारी ही कविता आहे. आपल्या आई बहिणीवर आत्याचार होत असताना तुम्ही नुसते पाहत राहणार असाल तर बांगड्या भरा. असेही सांगायला त्याचे शब्द मागेपुढे पाहत नाहीत

**समतेचे व मानवतेचे गीत गाणारी कविता –**

वामनदादांना समतेवर आधारित समाज निर्माण करायचा आहे. ते आपल्या कवितेतुनही तोच संदेश देतात बहुजनांच्या



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

हितासाठीच आपल्या कवितेची निर्मिती झाल्याचे ते निर्वाळा देतात. माणसाला केंद्र मानूनच त्याची कविता विस्तारते.

"माणसा इथे मी तुझे गीत गावे.
असे गीत गावे तुझे हित व्हावे
असे गोड नाते तुझ्याशी जडावे.
तुझ्या संकटांशी इथे मी लढावे' (हित व्हावे)

किंवा

"सांगू किती मी दादा, एकतेने येथे नांदा
यारे सारे भाऊ भाऊ, प्रेमभावे येथे राहू
तुटले दुवे सांधा' ( सांगू किती मी दादा)

कबीर, फुले, बुद्धांच्या विचारांची शिकवण बाबासाहेबांनी वामन दादाना दिली त्यामुळे समतेची व मानवतेची कास धरून वामनदादांनी आयुष्य वेचेलेले दिसते या संदर्भात स्वत: वामनदादा आपल्या माझ्या जीवनाचे गाणे या आत्मकथनात म्हणतात, "माझी गाणी बुद्ध, फुले, आंबेडकर यांच्या विचारांच्या अवतीभवतीच घिरट्या घालतात गाण्यासोबत माझ्या गाण्याची चालसुद्धा जन्माला येत असते. मला संगीतशास्त्र वा रागांची माहिती नाही..माझं गाणं तळागाळातल्या माणसासाठीच असतं"

"वामनदादांच्या धडपडीचे, त्यांनी उपसलेल्या कष्टाचे, त्यांच्या श्वासाचे, गाण्यातील शब्दांचे आणि त्यांच्या गायनाचे सार्थक झाले. वामनदादांचे एकेक गाणे म्हणजे तुफानातल्या अशा अनेक गीतांचे झाड हे झाड समाजमनाची सतत झाडझूड करीत राहणार आहे. येणाऱ्या प्रत्येक पिढीच्या हातात आंबेडकर देणार आहे."[६]

माणसाच्या जगण्याची, व्यथा वेदनांची कहाणी आपल्या लेखणीने जिवंत करणारा, बुद्ध, फुले, कबीर व आंबेडकरांचा खरा वारसदार शोभणारा, वामनदादा म्हणजे तुफानातील दिव्याचे कधीही न विझणारे तेजस्वी झाड आहे. त्याची गीत लोकभाषेतून प्रकटत असल्यामुळे ती थेट समाज मनाला जावून भिडतात. साधी-सहज भाषा, चफकल यमक, लयबद्धता, वीर रसाने ओतप्रोत भरलेली क्रांतीची भाषा आणि तितकाच उत्साह वाढवणारी वामनदादांची काळजाला भिडणारी चाल हे वामनदादाच्या कवितेचे मुख्य विशेष म्हणता येतील.

**वामनदादांच्या कवितेची लेखनशैली व वैशिष्ट्ये-**

१. काव्य, गीत, गायन आणि संगीत या चार गोष्टींचे एकच समीकरण म्हणजे वामनदादा यांची कविता.
२. त्यांची गायनशैली स्वयंभू साधनेची होती
३. शाहू, फुले, आंबेडकरांचा मानवकल्याणवादी विचार वामनदादांच्या कवितेतेतून प्रकटतो.
४. ही कविता दिनदलीतांच्या दुःखाला वाचा फोडणारी आहे.
५. ही कविता मुक्तछंद आणि छंदबद्ध या दोन्ही रूपातून अवतरते
६. वामनदादाची कविता प्रखर राष्ट्रवाद मांडते.
७. त्यांची कविता स्थलकाल, जात, धर्म याच्या पलीकडे जाऊन थेट काळजाला भिडणारी होती.

**संदर्भ-**


१. आंबेडकरवादी महागीतकार: वामनदादा कर्डक, डॉ. यशवंत मनोहर , युगसाक्षी प्रकाशन नागपूर, २००५, पृष्ठ-१०
२. काव्यकस्तुरी, प्रस्तावना, संपादक- बाळासाहेब गुंजाळ, अशोक शिंदे, भास्कर शेळके, नर्मदा पब्लिकेशन हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती २००६, पृष्ठ-२८
३. आंबेडकरवादी महागीतकार: वामनदादा कर्डक, डॉ. यशवंत मनोहर , युगसाक्षी प्रकाशन नागपूर, २००५, पृष्ठ-१३
४. वामनदादांच्या गीतांतील भीमदर्शन उत्तम , सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती २०१४, पृष्ठ-९
५. माझ्या जीवनाचं गाणं, वामनदादा कर्डक , पृ. ८७
६. आंबेडकरवादी महागीतकार: वामनदादा कर्डक, डॉ. यशवंत मनोहर , युगसाक्षी प्रकाशन नागपूर, २००५, पृष्ठ-११


◆◆◆◆◆



PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403
SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal, Tal.Shirur, Dist.Pune.